# तारापूर एज्युकेशन सोसायटीचे

# रामचंद्र हिराजी सावे विद्यालय, प्राथमिक शाळा, तारापूर

## वाषिक अहवाल सन २०१९ - २०२०

### व्हर्च्यूअल वार्षीक सर्व साधारण सभा दिनांक २६ सप्टेंबर २०२१, रविवार

तारापूर एज्युकेशन सोसायटीचे, रामचंद्र हिराजी सावे विद्यालय प्राथमिक शाळा २०१९ -२०२० या शैक्षणिक वर्षात प्राथमिक शाळेने ३४ व्या वर्षात पदार्पण केले आहे. प्राथमिक शाळेत एकूण ४१३ विद्यार्थी आहेत.

शाळेमध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असतो. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास म्हणजेच मानसिक, बौद्धीक तसेच नैतिक विकास होय. यासाठी शाळेमध्ये क्रमिकेतर उपक्रमांना अनन्य साधारण महत्त्व आहे. यासाठी वर्षभरात विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते.

१)चित्रकला -रंगभरण स्पर्धा, २)वक्तृत्त्व स्पर्धा,३)राखी बनविणे ४) कथाकथन स्पर्धा ५)कथालेखन स्पर्धा ६)शुभेच्छा कार्ड बनविणे ७)अभिनय गीत स्पर्धा ८) हस्ताक्षर स्पर्धा - मराठी व इंग्रजी ९) टाकाऊ पासून टिकावू वस्तू बनविणे १0) श्लोक पाठांतर ११)समूहगीत स्पर्धा १२)प्रश्न मंजूषा १३) राष्टभक्तीपर गीत स्पर्धा १४) प्रश्न मंजूषा १५)पाढे पाठांतर स्पर्धा १६) कीडा स्पर्धा १७)विज्ञान प्रदर्शन

सन २००७ - २००८ पासून 'इस्कॉन फाऊन्डेशना' तर्फे शाळेमध्ये उत्कृष्ट खिचडीचे वाटप केले जाते. या खिचडीची प्रत्यक्ष चव शिक्षकाकडून घेतली जाते व नोंद ठेवली जाते. पालघर जिल्हयातील पालघर तालुका हा दुष्काळग्रस्त घोषित केल्यामुळे उन्हाळीसुट्टीत विद्यार्थ्यांना पोषण आहाराचे वाटप करण्यात आले तसेच पूरक आहार म्हणून विद्यार्थ्यांना राजगिरा लाडू , खजूर, केळी यांचे सप्टेंबर महिन्यापर्यंत वाटप करण्यात आले.

प्रवेशोत्सव - नविन शैक्षणिक वर्षात शाळेचा प्रारंभ चैतन्यमय आणि उत्साहपूर्वक होण्याकरिता पहिले पाऊल ठेवणा-या विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाबपुष्प देऊन प्रवेशोत्सव साजरा केला. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व सर्व शिक्षक उपस्थित होते. त्यावेळी सर्व शिक्षा अभियान योजने अंतर्गत मोफत पाठयपस्तकांचे वाटप केले.

आंतरराष्ट्रीय योग दिन - २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन विद्यालयात साजरा केला. या प्रसंगी नियमित योगा केल्यामुळे होणारे फायदे व महत्व सविस्तरपणे सांगुन विविध आसने प्रात्यक्षिक व कृती शिक्षक विद्यार्थी यांनी सादर केले.

इ. १ ली ते ४ थीच्या वर्गाची आधीच्या अभ्यासक्रमावर आधारीत मराठी व गणित या विषयाची अंतर्गत पायाभूत परीक्षा दि.१५.०७.२०१९ ते १७.०७.२०१९ या कालावधीत संस्थेतर्फे घेण्यात आली.

१ ऑगस्ट पालघर जिल्हा वर्धापनदिन, जागतिक आदिवासी दिन, क्रांतीदिन, हुतात्मा दिन साजरा करण्यात आला. गुरूवार दि.२९.०८.२०१९ रोजी 'चंद्रकला' हा चित्रपट दाखविण्यात आला.

भगिनी समाज संस्थेतर्फे प्राथमिक विद्यालय सुवर्ण महोत्सवी वर्ष २०१९ - २०२० आयोजित तालुका स्तरीय आंतरशालेय कथाकथन स्पर्धेत पालघर येथे गट इ.१ ली ते ४ थी मध्ये द्वितीय क्रमांक आपल्या विद्यालयातील इ. ४ थी ची विद्यार्थीनी कु.कस्तुरी रविंद्र अहिरे हिला मिळाला आहे.तसेच पाठ्यपुस्तका बाहेरील कविता स्पर्धेत कु.मुद्रा सुबोध चुरी हीचा द्वितीय क्रमांक आला.

पालघर जिल्हा आयोजित आंतरशालेय क्रिडा स्पर्धा ( केळवे) येथे आयोजित केल्या होत्या. यामध्ये आपल्या शाळेने लंगडी सांघिक, चेंडूफेक, लांबउडी, रिले धावणे या स्पर्धेत भाग घेतला होता.

पालक प्रबोधनासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री.शशिकांत श्रवण चौधरी, बी.एस.सी.बी.एड्.माध्य.शिक्षक अणूविकास हायस्कूल, दांडी यांनी पालकांचे प्रबोधन व मुलांवरील संस्कार या विषयावर बहुमोल मार्गदर्शन केले.

पारितोषिक वितरण समारंभ - प्राथमिक विद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ तारापूर एज्युकेशन सोसायटीचे स्थायी समिती सदस्य मा.सौ.उल्का हेमराज करवीर हयांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुण्या मा.सौ.विजया हेमंत सावे , माजी पर्यवेक्षिका, रा.हि.सावे विद्यालय तारापूर या उपस्थित होत्या. या प्रसंगी प्रमुख पाहुण्या मा.सौ. मा.सौ. विजया हेमंत सावे यांनी प्राथमिक विद्यालयाला रू.५०००/- देणगी दिली.

SHChampaneker

सौ.श्रद्धा हेमंत चंपानेरकर
मुख्याध्यापिका
रा.हि.सावे विद्यालय,प्राथ.शाळा
तारापूर